# जबरीने मंगळसुत्र चोरुन नेणारे आरोपी आर्वी पोलीसांच्या जाळयात

फिर्यादी सौ. वैशाली विनोदराव परतेकी यांना दिनांक ११.०८.२०२१ रोजी वर्धामनेरी येथील बँकेत जाने असल्याने त्या दुपारी ०२.०० वा. चे सुमारास वर्धमनेरी येथे जाण्यासाठी त्यांचे घरुन पायदळ पायदळ आर्वी ते तळेगांव रोडवर असलेल्या मांडला बसस्टॉपवर गेल्या. तिथे त्या एकट्याच अँटोची वाट पाहत असतांना दुपारी ०३.३० वा. ०३.४५ वा. चे सुमारास दोन अनोळखी ईसम काळया रंगाच्या ॲक्टीव्हा मोपेड दुचाकी वाहनाने त्यांचे जवळ आले व मागे बसलेल्या मुलाने फिर्यादी यांना तुम्ही कुठे जात आहे असे विचारले त्यामुळे फिर्यादी यांना भिती वाटल्याने त्या मांडला गावाकडे पायदळ जाण्यास निघाल्या असता वाहनावरील मागे बसलेला मुलगा हा फिर्यादीचे मागे आला व त्याने फिर्यादीचे गळयातील ४.५ ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र जबरीने हिसकावुन चोरुन ॲक्टीव्हा मोपेड वाहनावर बसुन दोन्ही ईसम पळुन गेले. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन आर्वी येथे अप.क्र. ६२३/२०२१ कलम ३९२, ३४ भादंवि.चा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे तपासात गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून तसेच फिर्यादिने दिलेल्या वर्णना प्रमाणे दोन संशईत ईसम नामे १) शेख शाहबाज शेख रऊफ, वय २३ वर्ष, २) रोहीत गोपाळराव रामटेके, वय १९ वर्ष, दोन्ही रा. महाराणा प्रताप वार्ड, आर्वी यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशनला आणुन गुन्ह्यासंबधाने सखोल विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना सदर गुन्ह्यात अटक करुन त्यांचे अंगझडतीत दोन लाकडी मुठ व लोखंडी पाते असलेले चाकु जप्त करण्यात आला. तसेच पोलीस कस्टडी रिमांड दरम्यान आरोपीतांकडुन गुन्ह्यातील सोन्याचे डोरले व मनी असलेले ४.५ वजनाचे मंगळसुत्र कि. २०,६००/- रु. व गुन्ह्यात वापरलेली होंडा कंपनीची अक्टीव्हा मोपेड वाहन कि. ७०,०००/- रु. असा एकुण कि.९०,७०० रु. चा माल जप्त करण्यात करुन गुन्हा उघडकिस आणला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, आर्वी श्री सुनिल सांळुखे यांचे मार्गदर्शनात मा. पोलीस निरीक्षक श्री. संजय गायकवाड यांचे निर्देशाप्रमाणे पोउपनि. योगेश चाहेर व पोलीस अंमलदार भगवान बावणे, चंद्रेशखर वाढवे, भुषन निघोट, राजु राऊत, मनोज भोमले, राहुल देशमुख यांनी केली.